| MHYA170005702024 | | |
|---|---|---|
| | खटला दाखल तारीख | २९/०७/२०२४ |
| | पंजीकृत तारीख | २९/०७/२०२४ |
| | निकालाची तारीख | ०८/०६/२०२६ |
| | कालावधी ०१ वर्षे, १० महिने, ०९ दिवस | |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळंब यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : ह.ना.पोले यांचे समक्ष)**
**न्यायनिर्णय घोषित दिनांक ०८/०६/२०२६**
**(नियमीत फौजदारी खटला क्र. ५९/२०२४)**

| | |
|---|---|
| | गुन्हा रजिष्टर क्र.१९९/२०२४,<br>पोलीस ठाणे– कळंब, ता. कळंब, जि. यवतमाळ. |
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>कळंब पोलीस ठाणे,<br>ता.कळंब, जि. यवतमाळ. |
| अभियोगपक्षामार्फत | सहा.सरकारी अभियोक्ता–श्री. आर.आर.त्रिवेदी. |
| आरोपी | १. धम्मदिप विजयराव सुटे<br>वय २८ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>२. नागसेन महादेव सुटे<br>वय ३८ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>३. सुमेध महादेव सुटे<br>वय ३७ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>४. वैभव शांताराम पाटील<br>वय २९ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>सर्व रा.सुकळी, ता.कळंब, जि. यवतमाळ |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. डी.जी.तेलंगे |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २७/०४/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | २८/०४/२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | २९/०७/२०२४ |
| दोषारोप निश्चीत दिनांक | ०९/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०८/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०८/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – |

**<u>आरोपीची माहिती.</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील कलम | निर्दोष किंवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | खटल्यादरम्यान आरोपींनी भोगलेल्या कारावासाचा कालावधी कलम ४२८फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धम्मदिप विजयराव सुटे | कलम ४१(अ) नुसार सुचना पत्रावर सोडले | ०९/०७/२०२५ | ३२४ सहकलम ३४ भा.द.वि. | निर्दोष | – | – |
| २. | नागसेन महादेव सुटे | –do– | –do– | -do- | –do– | – | – |
| ३. | सुमेध महादेव सुटे | –do– | –do– | -do- | –do– | – | – |
| ४. | वैभव शांताराम पाटील | –do– | –do– | -do- | –do– | – | – |

**भाग 'क'**

## (Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार.

अ. अभियोगपक्ष–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अभि. सा.क्र.०१ | मंथन साहेबराव खडसे | फिर्यादी |
| अभि. सा.क्र.०२ | रतन बाबाराव पिसे | साक्षीदार |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| आरोपी.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| न्याया.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाने/ आरोपीने/ न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे

अ. अभियोग पक्ष–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ०१. | निरंक | निरंक |

ब. बचावपक्ष–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२८ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| २. | नि.क्र.२९ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | नि.क्र.३० | जप्ती पंचनामा |

ड. मुद्देमाल–

| अनु.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**

**(अधिघोषित दिनांक ०८/०६/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकीकत खालीलप्रमाणे आहे** :–

**०२**. फिर्यादी नामे मंथन साहेबराव खडसे यांनी पो.स्टे.कळंब येथे फिर्याद दिली की, दिनांक २७/०४/२०२४ रोजी रात्री ०९.४५ वाजताच्या सुमारास फिर्यादी यांचा मित्र विशाल यांचे लग्नाचे रिसेप्शन असल्यामुळे ते व त्यांचे मित्र नितिन असे त्यांचे मोटरसायकलने सुकळी येथे गेले होते. तेव्हा रिसेप्शनमध्ये डि.जे.जवळ जावुन त्यांचे मित्र व रिसेप्शन मधील लोक नाचत असल्याने ते पाहत होते. तेव्हा त्यांचे ओळखीचा आरोपी क्र.१ धम्मदिप हा त्यांचा मित्र रत्नदिप याचेसोबत नाचत असतांना धक्का लागल्याचे कारणावरुन वाद करुन ढकलढुकल करत होता. म्हणुन फिर्यादी भांडण सोडविण्यास गेले असता आरोपी क्र.१ धम्मदिपने त्याचे हातातील कडयाने त्यांचे डोक्यावर मारुन जखमी केले. त्यामुळे त्यांचे डोक्याला जखम होवुन रक्त निघत होती. तसेच आरोपी क्र.१ चा चुलतभाऊ आरोपी क्र.२ नागसेन, आरोपी क्र.३ सुमित व आरोपी क्र.४ वैभव यांनी सुध्दा त्यांना ढकलढुकल करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तेव्हा त्यांचा मित्र रत्नदिप, नितीन व करण यांनी त्यांचे भांडण सोडविले. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपींविरुध्द घटनेची फिर्याद पोलीस ठाणे, कळंब येथे नोंदवली.

**०३**. सदरील फिर्याद वरुन पोलीस ठाणे, कळंब, जि. यवतमाळ येथे गु.र.क्र.१९९/२०२४ कलम ३२४ सहकलम ३४ भा.दं.वी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४**. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये (नि.क्र.२०) वर दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपींवर लावण्यात आलेले आरोप त्यांनी नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द कोणताही आक्षेपजनक पुरावा मिळून आला नाही. त्यामूळे नि.क्र. ०१ वरील सविस्तर आदेशान्वये आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

**०५**. अभियोगपक्षाचे कथन विचारात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ आले. त्यावर मी खालीलप्रमाणे कारण–मिमांसेनुसार निष्कर्ष नोंदविले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) दिनांक २७/०४/२०२४ रोजी रात्री ०९.४५ वाजता मौजे सुकळी येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला हातातील कडयाने मारहाण करुन ईच्छापुर्वक साधी दुखापत करुन भा.द.वि.चे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली काय ? | ...नकारार्थी. |
| २) आदेश काय ? | ...अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

**०६.** अभियोगपक्षातर्फे आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता घटनेच्या दिवशी आरोपींनी फिर्यादीला हातातील कडयाने मारहाण करुन साधी दुखापत केली ही बाब संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ करीता</u> :–**

**०७.** अभियोगपक्षातर्फे सा.क्र.०१ तथा फिर्यादी नामे मंथन यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, दिनांक २७/०४/२०२४ रोजी रात्री ८.३० च्या दरम्यान ते व त्यांचा मित्र नितिन असे दोघे त्यांचा मित्र विशाल याच्या रिसेप्शनमध्ये सुकळी येथे गेले होते. तेव्हा आरोपी व त्यांच्यामध्ये डिजेमध्ये नाचण्याच्या कारणावरुन वाद झाला. त्यामुळे पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला मार लागल्याचे नाकारले आहे. फिर्यादीस उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता त्यामध्ये त्यांनी दिनांक २७/०४/२०२४ रोजी त्यांचा मित्र विशाल याच्या रिसेप्शनमध्ये गेले असता धम्मदिप याने त्याचे हातातील कडयाने मारुन जखमी केले होते, त्यामुळे त्यांच्या डोक्याला इजा झाली होती, नागसेन, सुमित व वैभव यांनी त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केल्याचे नाकारले आहे. फिर्यादी पुढे मान्य करतात की, त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे.

**०८.** जखमी साक्षीदार सा.क्र.०२ रतन हे त्यांच्या साक्षपुराव्यात कथन करतात की, दिनांक २७/०४/२०२४ रोजी रात्री ८.३० च्या दरम्यान ते व त्यांचा मित्र नितिन तसेच मंथन खडसे असे सर्व त्यांचा मित्र विशाल याच्या रिसेप्शनमध्ये सुकळी येथे गेले होते. तेव्हा आरोपी व त्यांच्यामध्ये डिजे मध्ये नाचण्याच्या कारणावरुन वाद झाला. तेव्हा पडल्यामुळे त्यांचा मित्र मंथन यांच्या डोक्याला मार लागला. त्यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात आरोपींनी संगनमत करुन त्यांना मारहाण केल्याचे नाकारले आहे. फिर्यादीस उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता त्यामध्ये त्यांनी दिनांक २७/०४/२०२४ रोजी त्यांच्या मित्र विशाल याच्या रिसेप्शनमध्ये गेले असता धम्मदिप याने त्याच्या हातातील कडयाने मारुन मंथनला जखमी केले, त्यामुळे त्यांच्या डोक्याला ईजा झाली, नागसेन, सुमित व वैभव यांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे नाकारले आहे. साक्षीदार

पुढे मान्य करतात की, त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे.

**०९.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार सा.क्र.०२ रतन हे सर्वात महत्वाचे साक्षीदार आहे. उक्त साक्षीदारांनी त्यांच्या साक्षपुराव्यात आरोपींमध्ये व त्यांच्यामध्ये बांधकामाचे कारणावरुन वादावादी झाल्याने रागाच्या भरात फिर्यादीने फिर्याद दिली असे कथन केले आहे. फिर्यादी व सा.क्र.०२ रतन यांनी पुढे त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे देखील मान्य केले आहे. त्यामुळे अभियोगपक्षास आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप निःसंदिगधपणे सिध्द करण्यास अपयश आल्याचे स्पष्ट होते. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा मिळून आलेला नाही. सबब, मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०२ करिता</u> –**

**१०.** भा.द.वि. कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष म्हणून मुक्त करण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.०२ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**–: <u>आ दे श</u> :–**

(१) आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये कलम ३२४ सहकलम ३४ भारतीय दंड संहितेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

(३) आरोपींना निर्देशीत करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–(अ)(१) नुसार त्यांनी सहा महिन्यांसाठी त्यांचे रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

(४) जप्त मुद्देमाल एक स्टिलचा कडा हा मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्याचा नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित व निर्गमीत करण्यात आले.)

HARSHAL NANASAHEB POLE

Digitally signed by HARSHAL NANASAHEB POLE
Date: 2026.06.08 16:27:36 +0530

**(ह.ना.पोले),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कळंब, जि.यवतमाळ

दिनांक : ०८/०६/२०२६
ठिकाण : कळंब.